मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# शहरातील एनएच-48 महामार्ग सेवा रस्त्यांचा होणार विस्तार!

## वाहतूक होणार सुरळीत : नागरिकांसाठी ठरणार महत्त्वाचा प्रकल्प

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका हद्दीतून जाणाऱ्या एनएच-४८ महामार्गालगत असणाऱ्या सेवा रस्त्यांचा (सर्व्हिस रोड) विकास करण्याच्या दिशेने भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अर्थात एनएचएआय प्रकल्प हाती घेत आहे. हा प्रकल्प वाढत्या वाहतूक समस्यांचे निराकरण करण्यासोबतच कनेक्टिव्हिटी सुधारणे, रस्त्यावरील वाहनांची वर्दळ कमी करणे आणि सर्वाधिक वर्दळीच्या मार्गांपैकी एक असलेल्या या रस्त्यावरील शाश्वत पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे.



पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीतील एनएच-४८ महामार्गाच्या बाजुने असणारा सध्याचा रस्ता १२ मीटर रुंद आहे. आता या रस्त्याचा १२ मीटर विस्तार करून एकूण रुंदी २४ मीटर करण्यात येणार आहे. एनएच-४८ हा एक महत्त्वाचा राष्ट्रीय महामार्ग असल्याने पुनावळे, भूमकर चौक, हिंजवडी आणि बालेवाडी या भागांतील वेगाने वाढणाऱ्या रहदारीच्या दृष्टीने हा विकास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.

पिंपरी चिंचवड महापालिका हद्दीमध्ये एनएच-४८ महामार्ग आणि सेवा रस्त्यांसह एकूण कॅरेजवे ६० मीटर लांबीचा आहे. या रस्त्याच्या दोन्ही बाजूंना पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजनात असलेले प्रत्येकी १२ मीटर रुंद विकास आराखडा (डीपी) रस्ते आहेत. त्यामुळे या रस्त्याची एकूण रुंदी ८४ मीटर होईल. यामुळे कनेक्टिव्हिटी सुधारण्यासाठी मदत होईल.

### नागरिकांच्या दीर्घकालीन मागण्यांना प्रतिसाद

कनेक्टिव्हिटी सुधारण्याच्या दृष्टीने नागरिकांनी सेवा रस्त्यांची स्थिती सुधारण्याची मागणी सातत्याने केली जात होती. सद्यस्थितीतील सेवा रस्त्यांची दयनीय अवस्था, पावसाळ्यात पाणी साचण्याच्या समस्या आणि यामुळे निर्माण होणाऱ्या अडचणींबाबत अनेक प्रवासी आणि व्यवसायिकांनी वेळोवेळी तक्रारी येत होत्या. अखेर नागरिकांच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारा हा प्रकल्प लवकरच सुरू होत आहे.

### प्रकल्पाची वैशिष्ट्ये..

» या प्रकल्पासाठी ६०४.५९ कोटी रुपयांचा अंदाजे खर्च असून रुंदीकरण आणि सुधारित सेवा रस्त्यांमुळे वाहतूक कोंडी लक्षणीय प्रमाणात कमी होईल, प्रवास अधिक सुरक्षित आणि सुरळीत होईल. यासोबतच रस्त्याच्या टिकाऊपणासाठी काँक्रीट फुटपाथ, पाणी साचण्यापासून बचावासाठी प्रगत निचरा प्रणाली, स्थानिक प्रवाशांसाठी आणि व्यवसायांसाठी वाहतूक अधिक सोयीस्कर आणि सुलभ होणार आहे.

"एनएच-४८ हा महामार्ग पिंपरी चिंचवड महानगरपालिकेतील महत्त्वाचा वाहतूक मार्ग आहे. पिंपरी चिंचवड शहर आता एक औद्योगिक नगरी म्हणून पुढे आली आहे. येथे शहरीकरण झपाट्याने झाले आहे. त्यामुळे आता एनएच-४८ महामार्गावर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी होते. नवीन सेवा रस्त्यांमुळे मुख्य महामार्गावरील गर्दी कमी होईल. वाहतूक व्यवस्थापन सुधारेल. स्थानिक प्रवाशांसाठी आणि व्यवसायांसाठी सुलभ प्रवेश मिळवून देण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरेल. हा प्रकल्प शहराच्या दीर्घकालीन पायाभूत सुविधांच्या विकासासाठी महत्त्वाचा आहे.

- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक,
पिंपरी- चिंचवड महानगरपालिका.

# अनधिकृत पत्राशेडवरील कारवाईचा मार्ग मोकळा

## विरोधातील याचिका सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली : महापालिकेकडून धडक कारवाई होणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने चिखली येथील कुदळवाडी व जाधववाडी परिसरातील अनधिकृत बांधकाम व पत्राशेडवर कारवाई केली जात आहे. कारवाईच्या विरोधात तेथील व्यावसायिकांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. ती न्यायालयाने सोमवारी (दि.6) फेटाळली आहे. त्यामुळे महापालिकेकडून धडक कारवाई होणार हे स्पष्ट झाले आहे.

येथील भंगार दुकाने व गोदामामुळे मोठ्या प्रमाणात वायू, ध्वनी व जल प्रदूषण होत आहे. तसेच, वारंवार होणाऱ्या आगीच्या घटनेमुळे

जीवितहानी होण्याचा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे महापालिकेने येथील तब्बल 5 हजार भंगार दुकाने व गोदामे तसेच, वेगवेगळ्या आस्थापनांना महापालिकेच्या क आणि फ क्षेत्रीय कार्यालयाने नोटीस बजावली होती. पंधरा दिवसांच्या मुदतीमध्ये



अनधिकृत बांधकाम व पत्राशेड काढून घेण्याचे नोटीसीमध्ये बजावण्यात आले आहे.

ती मुदत संपल्यानंतर महापालिकेचे अतिक्रमण विरोधी पथक पोलिस बंदोबस्तात गुरुवारी (दि.30) कुदळवाडी पोहचले होते. मात्र, व्यावसायिकांनी रस्त्यावर उतरून रास्ता- रोको आंदोलन करीत कारवाईस विरोध केला. त्यामुळे पथक कारवाई न करता माघारी फिरले होते. दुसऱ्या दिवशी (दि.31) व्यावसायिकांच्या शिष्टमंडळासोबत झालेल्या बैठकीत बांधकामे व पत्राशेड काढून घेण्यासाठी 7 दिवसांची मुदत देण्यात आली. शुक्रवारी (दि.7) पासून सरसकट कारवाई केली जाणार आहे.

कारवाई करण्यात येऊ नये म्हणून इकबाल ख्वाजा संगम व इतरांनी सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. न्यायालयाने ती याचिका तातडीने स्वीकारून त्यावर सोमवारी (दि.6) सुनावणी घेतली. त्यात न्यायालयाने ती याचिका फेटाळून लावली आहे. त्यामुळे पालिकेकडून भंगार दुकाने व गोदामांवर कारवाईचा मार्ग मोकळा झाला आहे.

# 'जीबीएस संसर्गजन्य नाही; राज्यात आजार नियंत्रणात'

## केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांची माहिती : विविध विभागाच्या अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे शहरात जीबीएस रुग्णांची संख्या वाढत आहे. मात्र, हा आजार संसर्गजन्य नाही. यामुळे परिस्थिती पूर्णपणे नियंत्रणात आहे. तसेच, राज्यात या आजारांवर लागणारी औषधे पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याचे केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी ऑनलाइन बैठकीत सांगितले. या वेळी केंद्रीय आयुषमंत्री प्रतापराव जाधव, आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षणमंत्री हसन मुश्रीफ, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ आदीसह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्डा यांनी सविस्तर आढावा घेत विविध विभागांच्या अधिकाऱ्यांना महत्त्वपूर्ण सूचना केल्या. यामध्ये ज्या ठिकाणी जीबीएस रुग्णसंख्या वाढत आहेत, त्या भागात प्रत्यक्ष पाहणी करण्यात यावी.



कुकुटपालन व्यवसाय असलेल्या परिसराला भेटी द्याव्यात. पाणीपुरवठा आणि शुद्धीकरण विभागाने विशेष जलशुद्धीकरण मोहीम राबवावी. ज्या ठिकाणी पाइपलाइन दुरुस्तीची गरज असेल तिथे ती तत्काळ करण्यात यावी तसेच मागील दोन महिन्यांतील पाणीपुरवठा आणि आरोग्यविषयक बाबींचा आढावा घ्यावा, असे निर्देश प्रशासनाला दिले.

सर्व रुग्णालयांनी शासनाने ठरवून दिलेल्या एसओपीचे पालन करावे, असे सांगत रुग्णांना फिजिओ थेरेपीसोबतच मानसिक आरोग्य सुधारण्यासाठी सल्ला देण्याच्या सूचना जे. पी. नड्डा यांनी दिल्या. पुण्यातील जीबीएस रुग्णाबद्दलची इत्थंभूत माहिती केंद्र सरकारला दिली आहे. राज्यातील जीबीएस परिस्थितीवर आमचे पूर्ण लक्ष असून, पुणे महापालिका आणि राज्य सरकार समन्वय साधून यासाठी त्या सर्व उपाययोजना करत आहेत, अशा सूचना माधुरी मिसाळ यांनी दिल्या.

राज्याच्या पशुपालन विभागानेही विविध ठिकाणचे नमुने घेण्यास सुरुवात केली आहे. त्यामध्ये पाण्याचे 22 ठिकाणचे नमुने, मातीचे 11 ठिकाणचे नमुने, कोअँकल स्वॅबचे 35 नमुने, ट्रॅकियल स्वॅबचे 39 नमुने आणि फिकलचे 12 नमुने तपासणीसाठी पाठवण्यात आल्याचे अहवालात नमूद केले आहे.

महापालिकेने 43 हजार 793 हजार घरांमध्ये जाऊन 1 लाख 31 हजार 175 नागरिकांची आरोग्याची माहिती घेतली आहे. त्यामध्ये अतिसाराची लागण झालेले 168 जणांची नोंद करण्यात आली असून, त्यांचे शौच नमुने, रक्त नमुने आणि लघवीचे नमुने घेऊन ते प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे.

अन्न आणि औषध प्रशासनाकडूनही अन्नाचे नमुने प्रयोगशाळेकडे पाठवण्यात येत आहेत. या वेळी पोल्ट्रीचे 63 नमुने प्रयोगशाळेकडे पाठवण्यात आले आहेत. त्याचा अहवाल अद्याप प्राप्त झाला नाही. याशिवाय महापालिकेच्या पशुवैद्यकीय विभागाकडून दूषित मांस, सी फूड यांच्या नमुन्यांची तपासणी करण्यात येत असून, 11 नमुने कोंढवा येथील प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले होते. त्याचा अहवाल आला असून, तो निगेटिव्ह आहे.

### 'जीबीएस'चे राज्यात 168 रुग्ण

**» गुलेन-बॅरी सिंड्रोमच्या रुग्णांमध्ये सातत्याने वाढ होताना दिसत आहे. सोमवारी 10 नवीन रुग्णांची नोंद झाली असून, आत्तापर्यंतची रुग्णसंख्या 168 इतकी झाली आहे. यातील 86 समाविष्ट गावांतील, 32 रुग्ण पुणे महापालिका हद्दीतील, 18 रुग्ण पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील, 19 रुग्ण ग्रामीण हद्दीतील, तर 8 इतर जिल्ह्यांतील आहेत, जे पुण्यात उपचार घेत आहेत. आत्तापर्यंत 47 रुग्णांना घरी सोडण्यात आले असून, 47 रुग्ण आयसीयूमध्ये दाखल आहेत. एकूण रुग्णांपैकी 21 जण व्हेंटिलेटरवर आहेत.**

# शहरात 76 खासगी रुग्णालयांना नोटीस

## पुणे, नाशिक जिल्ह्यात साथीदारांच्या मदतीने 16 गुन्हे : 14 लाख 50 हजारांचा ऐवज जप्त

**पुणे | प्रतिनिधी**

आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिलेल्या सूचनांनुसार महापालिकेच्या आरोग्य विभागाकडून शहरातील खासगी रुग्णालयांची विशेष मोहिमेअंतर्गत तपासणी केली जात आहे. आत्तापर्यंत 714 रुग्णालयांची तपासणी केली असून, 76 रुग्णालयांना नोटीस बजावली आहे. एक महिन्यात त्रुटी पूर्ण करण्याच्या सूचना दिल्या आहेत.

महापालिकेच्या आरोग्य विभागाअंतर्गत शहरात 899 नोंदणीकृत खासगी रुग्णालये आहेत. सहायक आरोग्य अधिकारी, पाच परिमंडल वैद्यकीय अधिकारी, 15 क्षेत्रीय वैद्यकीय अधिकारी यांच्या नेतृत्वाखाली तपासणी सुरू केली आहे.




सार्वजनिक आरोग्य विभागाच्या सूचनेनुसार, खासगी रुग्णालयांनी दर्शनी भागात दरपत्रक लावले आहे का, अग्निशमन दलाचे ना-हरकत प्रमाणपत्र आहे का, जैववैद्यकीय कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावली जाते का, या निकषांची पाहणी करण्यात येत आहे.

### नोटिसा खूप झाल्या; कारवाई कधी होणार?

**» गेल्या महिनाभरात खासगी रुग्णालयांची तपासणी केली आहे. यामध्ये 76 रुग्णालयांमध्ये नियमांचा भंग होत असल्याचे आढळले आहे. त्यानुसार रुग्णालयांना त्रुटी दूर करण्यासंदर्भात नोटीस बजावली आहे. त्यासाठी त्यांना तीस दिवसांची मुदत दिली आहे. वर्षभरातून दोनदा होणाऱ्या तपासणीत त्रुटी आढळल्यास केवळ नोटीस बजावली जाते. त्यामुळे ठोस कारवाई कधी होणार, हा प्रश्न गुलदस्त्यातच आहे.**

" शहरात एकूण 899 नोंदणीकृत रुग्णालये असून, त्यांची तपासणी करण्याची मोहीम सुरू आहे. नोटीस पाठवलेल्या रुग्णालयांमध्ये मोठी नसून छोटी रुग्णालये आहेत. त्यामध्ये दरपत्रक नसणे, तक्रार निवारण क्रमांक नसणे, रुग्ण हक्क सनद, जैववैद्यकीय कचरा आदी नियमांचे उल्लंघन केल्याचे आढळल्यानंतर त्यांना नोटीस बजावून सुधारणा करण्यासाठी महिन्याची मुदत दिली आहे.

**- डॉ. सूर्यकांत देवकर, सहायक आरोग्य अधिकारी, पुणे.**

# भंगार दुकानांवरील कारवाई सात दिवस लांबणीवर

## महापालिका सात फेब्रुवारीपासून चिखली, कुदळवाडी, जाधववाडीत सरसकट कारवाई करणार



**पिंपरी | प्रतिनिधी**

चिखली येथील कुदळवाडी, जाधववाडी परिसरातील अनधिकृत भंगार दुकाने व गोदामावर कारवाई मोहीम सात दिवसांसाठी स्थगित करण्यात आली आहे. या मुदतीमध्ये अनधिकृत बांधकाम व पत्राशेड काढून घ्यावे, असे आवाहन महापालिकेच्या मध्यवर्ती अतिक्रमण विरोधी विभागाने केले आहे; मात्र त्यानंतर सरसकट कारवाई मोहीम राबविली जाणार आहे, असे महापालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.

येथील अनधिकृत भंगार दुकाने व गोदामे तसेच, बेकरी, हॉटेल, किराणा, वर्कशॉप, लॉण्डी, गॅरेज, हार्डवेअर, स्पेअर पार्ट अशा तब्बल 5 हजार अनधिकृत आस्थापनांना महापालिकेच्या 'क' आणि 'फ' क्षेत्रीय कार्यालयाने नोटीसा बजावल्या आहेत. पंधरा दिवसांत स्वत:हून अनधिकृत बांधकाम व पत्राशेड काढून घेण्यास त्यांना सुचित केले होते. ती मुदत संपल्यानंतर महापालिकेने गुरूवारी (दि.30) पासून कारवाई मोहीम सुरू केली होती. त्यासाठी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मात्र, तेथील व्यावसायिक, दुकानदार व नागरिक मोठ्या संख्येने देहू-आळंदी रस्त्यावर जमा होऊन रास्ता रोको केला. त्यामुळे महापालिकेचे पथक गुरूवारी कारवाई न करता मागे फिरले.

दुसऱ्या दिवशी शुक्रवारी (दि.31) महापालिकेचे पथक पोलिस बंदोबस्तात कुदळवाडी येथे पोहचले; मात्र हजारोंच्या संख्येने व्यावसायिक, दुकानदार व नागरिक रस्त्यावर जमा झाले होते. त्यांनी आपल्या तीव्र भावना व्यक्त केल्या. त्यामुळे पुन्हा तणाव निर्माण झाला होता. व्यावसायिकांनी दुकान, गोदाम व वर्कशॉप काढून घेण्यासाठी सहा महिन्यांची मुदत देण्याची मागणी पोलिस अधिकाऱ्यांकडे केली. या संदर्भात दुपारी तीनला महापालिका भवनात बैठक घेऊन चर्चा करू. त्यावेळी व्यावसायिकांच्या एका शिष्टमंडळाने उपस्थित राहावे, असे पोलिस अधिकाऱ्यांनी

व्यावसायिकांना सांगितले. व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ दुपारी तीनला महापालिकेत पोहचले. मध्यवर्ती अतिक्रमणविरोधी विभागाचे उपायुक्त मनोज लोणकर यांच्या दालनात बैठक झाली. यावेळी शहर अभियंता मकरंद निकम, पोलिस उपायुक्त शिवाजी पवार, वरिष्ठ पोलिस निरीक्षक विठ्ठल साळुंखे, इतर अधिकारी तसेच, कुदळवाडीतील व्यावसायिकांचे शिष्टमंडळ उपस्थित होते.

आयुक्त शेखर सिंह यांच्यासोबत झालेल्या चर्चेनुसार कुदळवाडीतील व्यावसायिकांना सात दिवसांची मुदत देण्यात येईल. ती मुदत 6 फेब्रुवारीपर्यंत आहे. त्यानंतर 7 फेब्रुवारीपासून महापालिकेकडून सरसकट कारवाई करण्यात येईल, असे असे उपायुक्त मनोज लोणकर यांनी सांगितले; मात्र व्यावसायिकांनी सहा महिन्यांची मुदत मागितली. त्या मागणीस पालिका प्रशासनाकडून स्पष्ट नकार देण्यात आला.

# आळंदीतील अनधिकृत वारकरी शिक्षण संस्थांवर कारवाई करा

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे निर्देश : वारकरी शिक्षण संस्थांना भेटी





**पिंपरी | प्रतिनिधी**

आळंदीतील अनधिकृत वारकरी शिक्षण संस्थांवर ४८ तासात कारवाई करण्याचे निर्देश राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनी दिले. आळंदी परिसरातील वारकरी विद्यार्थी वसतीगृहांमध्ये होणाऱ्या बालकांच्या लैंगिक शोषण संदर्भात महिला आयोगाकडे प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने वारकरी शिक्षण संस्थांची पाहणी करत आतापर्यंत झालेल्या पोलीस तपासाचा आढावा त्यांनी आज घेतला.

यावेळी पोलीस उपअधीक्षक शिवाजी पवार, आयोगाच्या सदस्य सचिव श्रीमती नंदिनी आवडे, जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी मनीषा बिरारीस, प्रांताधिकारी अनिल दौंडे, तहसीलदार ज्योती देवरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक बी. एस.नरके, मुख्याधिकारी कैलास केंद्रे तसेच ग्रामस्थ उपस्थित होते.

पोलीस तपासाचा आढावा घेतल्यानंतर श्रीमती चाकणकर म्हणाल्या, वारकऱ्यांचे श्रद्धास्थान असलेल्या आळंदीमध्ये वारकरी शिक्षण संस्थांमध्ये गैरप्रकार सुरू असल्याच्या व मुलांचे लैंगिक शोषण होत असल्याच्या अनेक तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. गुन्हा दाखल झालेल्या प्रकरणी पोलिसांनी तातडीने तपास करावा. तसेच पोलीसांनी पुढाकार घेत, मुलांना विश्वासात घेऊन अजून असे प्रकार झाले असतील तर त्या दृष्टीने ही कारवाई करावी असे त्यांनी सांगितले.

बालकांच्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी शासनाच्या महिला व बालविकास विभागाच्या शासन निर्णयानुसार खाजगी वसतीगृहांसाठी नियमावली करण्यात आली आहे. या नियमावलीचे पालन न करणाऱ्या संस्थांचा अहवाल सात दिवसात सादर करावा. संस्था सुरू करण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास विभाग यांची परवानगी तसेच धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडे नोंदणी आवश्यक आहे. नोंदणी नसलेल्या संस्थांवर दोन दिवसात कारवाई करा असे त्यांनी सांगितले.

त्या पुढे म्हणाल्या, परवानगी असलेल्या परंतु नियमावलीचे पालन न करणाऱ्या संस्थांची मान्यता रद्द करण्यात यावी. नियमावलीनुसार मुला- मुलींची निवास व्यवस्था स्वतंत्र करण्यात यावी. वसतीगृहांमध्ये आवश्यक कर्मचारी वर्ग असावा, पुरेशी निवास व्यवस्था, स्वतंत्र अभ्यासिका, बालकांच्या संख्येनुसार स्नानगृहे, स्वच्छतागृहे असावीत. पालकांच्या विनंती अर्जानुसार बालकांना संस्थेमध्ये प्रवेश द्यावा, पुरेसे स्वच्छ व निर्जंतुक पिण्याचे पाणी इत्यादी नियमांचे तंतोतंत पालन संस्थांनी करावे असेही त्यांनी सांगितले. स्थानिक पातळीवर पोलीस विभाग, महिला व बाल विकास, महसूल, नगरपालिका, शिक्षण व स्थानिक ग्रामस्थ यांची समिती करण्यात येईल. या समितीकडून संस्थांची वारंवार तपासणी करून त्याचा अहवाल शिक्षण विभागात सादर करावा, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

यावेळी त्यांनी आळंदीतील ग्रामस्थांसोबत संवाद साधून त्यांच्या वारकरी शिक्षण संस्थेविषयी तक्रारी जाणून घेतल्या. स्थलांतरित संस्था तसेच वारकरी शिक्षण संस्थांना भेटी देऊन विद्यार्थी संख्या, त्यांची राहण्याची व्यवस्था, संस्थेतील विद्यार्थी नोंदणी रजिस्टर आदींची पाहणी केली.

# पुणेकरांना मिळणार हक्काची आणखी 4 हजार घरे

## प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत दुसऱ्या टप्प्यात महापालिकेचे नियोजन

**पुणे | प्रतिनिधी**

प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत महापालिकेकडून आता दुसऱ्या टप्प्यात चार हजारांहून अधिक सदनिका बांधण्यात येणार आहेत. बालेवाडीसह मुंढवा, धानोरी व वडगाव अशा वेगवेगळ्या भागांत या सदनिका बांधण्यात येणार आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सोमवारी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगच्या माध्यमातून या प्रधानमंत्री आवास योजनेचा आढावा घेऊन त्यास गती देण्याच्या सूचना महापालिका प्रशासनाला केल्या.



सर्वांना हक्काचे घर मिळावे यासाठी केंद्र सरकारने पंतप्रधान मंत्री आवास योजना हाती घेतली आहे. या योजनेंतर्गत पुणे महापालिकेकडून पहिल्या टप्प्यात 2 हजार 658 इतक्या सदनिका बांधण्यात आल्या आहेत. त्यामध्ये हडपसर येथे तीन, खराडी येथे 1 व वडगाव येथे 1 अशा चार प्रकल्पांचा समावेश आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना ही घरे देण्यात आली असून, आठ ते दहा लाख रुपयांपर्यंत या घरांच्या किमती आहेत.

दरम्यान, आता या योजनेंतर्गत दुसऱ्या टप्प्यात शहरातील बालेवाडी, धानोरी, कोंढवा, हडपसर, वडगाव खुर्द अशा वेगवेगळ्या पाच ठिकाणी तब्बल 4 हजार 162 सदनिका बांधण्यात येणार आहेत. मुख्यमंत्र्यांनी वॉर रूमच्या माध्यमातून या योजनेचा आढावा घेतल्याची माहिती आयुक्त राजेंद्र भोसले यांनी दिली.

### प्रधानमंत्री आवास योजनेत प्रस्तावित सदनिका

- धानोरी- 676
- कोंढवा - 736
- हडपसर - 2000
- वडगाव खुर्द - 465
- एकूण - 4173

### उत्पन्नाची मर्यादा सहा लाख

**» सहा लाखांपर्यंत वार्षिक उत्पन्न असलेल्या घटकातील नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजनेचा लाभ घेता येणार आहे. या योजनेंतर्गत वैयक्तिक स्वरूपात घरकुल, भागीदारी तत्त्वावरील परवडणारी घरे, भाडेतत्त्वावरील परवडणारी घरे व व्याज अनुदान योजना अशा चार प्रकारांमध्ये घरे बांधणीचे प्रस्तावित आहे. महापालिकेकडे या योजनेसाठी यापूर्वी 852 जणांनी अर्ज दाखल केले असल्याची माहिती महापालिकेचे मुख्य अभियंता प्रशांत वाघमारे यांनी दिली. या योजनेच्या पुढील प्रक्रियेनंतर नव्याने अर्ज मागविले जाणार आहेत.**

# मांजरी गावात पाण्याचा प्रश्न बिकट; महापालिकेचा पाणीपुरवठा अपुरा

## टँकरसाठी मोजावे लागतात हजारो रुपये : पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ

**पुणे | प्रतिनिधी**

उन्हाळ्याची चाहूल लागताच मांजरी गावात पाण्याचा प्रश्न बिकट झाला आहे. मांजरी गावातील झोपडपट्टी परिसर, मांजरी फार्म, महादेवनगर, घुले वस्ती, गोपाळपट्टी, मुंढवा रस्ता या भागातील नागरिकांना गेल्या महिन्यापासून पाण्यासाठी वणवण फिरण्याची वेळ आली आहे. या भागातील नागरिकांवर पाणी मिळण्यासाठी टँकरला हजारो रुपये मोजण्याची वेळ आहे.



महापालिकेत मांजरी गावाचा समावेश झाल्यानंतर गावात पाणी येईल, अशी अपेक्षा ग्रामस्थांना होती, त्यानुसार महापालिकेने पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली आहे. परंतु संपूर्ण गावात पाण्याचे जाळे निर्माण करण्यास अद्याप महापालिकेला यश आलेले नाही, तर ज्या ठिकाणी पाण्याची पाईपलाईन टाकण्यात आली आहे, तेथून नळ कनेक्शन घेणे सुरू केले आहे, परंतु अपुरा पाणीपुरवठा होत असल्याने नागरिकांचा घसा कोरडा पडण्यास सुरुवात झाली आहे. त्यामुळे ज्या भागात पाणी नाही तिथे शुद्ध पाण्याचा पुरवठा करावा, अशी मागणी नागरिकांनी केली आहे.

नवीन वर्ष उजाडताच मांजरी गावात पाण्याचा प्रश्न निर्माण होण्यास सुरुवात झाली होती. फेब्रुवारी महिन्यातच कूपनलिकांनी तळ गाठला आहे. त्यामुळे पिण्याचेच पाणी मिळण्याच्या मोठ्या समस्येला सामोरे जावे लागत असताना वापरायच्या पाण्याचादेखील प्रश्न बिकट झाला आहे. त्यामुळे यंदाचा उन्हाळा कसा जाणार, असा प्रश्न ग्रामस्थांना पडला आहे. मांजरी गावातील वस्त्यांवर पाण्याच्या टाक्या बसविण्यात आल्या आहेत. त्यामध्ये पाणी सोडले जात होते. मात्र आता ते बंद झाले आहे. त्यामुळे पाणीपुरवठा करण्यासाठी टँकर पुरवला जात आहे. मात्र तोदेखील वेळेत येत नसल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. मांजरीत पाण्याची मोठी टाकी बांधण्यात आली आहे. त्या टाकीत पाणी सोडले जात आहे.

**पाणीपुरवठ्याचे नियोजन नाही, मिळकतकर आकारणी मात्र जोरात**

मांजरी गाव महापालिकेत समाविष्ट होऊन अडीच वर्षे उलटली आहेत. तरीही महापालिकेला गावच्या पाण्याचे नियोजन करता आलेले नाही. मात्र मिळकतकर आकारणी जोरात सुरू केली होती. मांजरी गावात अनेक वर्षांपासून पाण्याचा प्रश्न बिकट आहे. गावकऱ्यांच्या शेतातील विहिरी आणि शेताला सोडणाऱ्या बोरवेलमधून गावातील इतर नागरिक पाण्याचा वापर करत आहेत. महापालिकेत समावेश झाल्यानंतर पाण्याचा प्रश्न सुटेल, अशी अपेक्षा नागरिकांना होती. मात्र महापालिका अद्याप पाणीपुरवठा पुरेशा प्रमाणात करू शकली नाही. त्यामुळे ग्रामस्थांनी नाराजी व्यक्त केली आहे.

### 20 टक्के पाणीपट्टी आकारण्याचा प्रस्ताव

**» महापालिकेत नव्याने समाविष्ट २३ गावांमध्ये पाणीपुरवठा करण्यास सुरुवात केली आहे. या गावांमध्ये मांजरी गावाचादेखील समावेश आहे. मांजरी गावाला पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यास अपयश आले आहे. असे असले तरीही गावांसह मांजरी गावात २० टक्के दराने पाणीपट्टी आकारण्याचा प्रस्ताव महापालिकेच्या स्थायी समितीपुढे ठेवण्यात आला आहे. पाणी नाही तर कर का भरायचा, असा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.**

> मांजरी गावात अनेक वर्षांपासून पाण्याचा प्रश्न गंभीर आहे. गावाचा समावेश महापालिकेत झाल्यानंतर तरी पाणीप्रश्न सुटेल, अशी अपेक्षा होती. मात्र महापालिकेच्या उदासीन कारभारामुळे पाण्याच्या पाईपलाईनची कामे सुरू आहेत. दरवर्षी एप्रिल-मे महिन्यात पाण्याचा प्रश्न बिकट होत असतो. यंदा महापालिकेकडून पाणीपुरवठा सुरू झाल्याने काही अंशी दिलासा मिळेल. परंतु जो भाग कूपनलिकांवर अवलंबून आहे, त्या भागातील नागरिकांना पाण्यासाठी वणवण भटकण्याची वेळ येणार आहे. महापालिकेने वेळीच यावर मार्ग काढून शुद्ध पाण्याचा पुरवठा करावा.
>
> **- राजेंद्र साळवे, अध्यक्ष, अखिल मांजराई नगर नागरिक कृती समिती.**